# मार्च २०२४

माघ / फाल्गुन
शके १९४५

# कालनिर्णय

३

○ अधिक शास्त्रार्थ मागील बाजूस पाहा.

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र<br>रविवार | फाल्गुन कृ. ६<br>श्री एकनाथ षष्ठी पैठण यात्रा<br>बगाजी महाराज यात्रा-वरूड बगाजी (अमरावती)<br>माधवनाथ महाराज पुण्यतिथी -चित्रकूट, इंदौर<br>**ईस्टर संडे**<br>**३१**<br>०६.१० १८.२६ वृश्चिक २२.५५ | माघ कृ. ७ शुभ दिवस (दु.३.५४प.)<br>भानुसप्तमी<br>श्री गजानन महाराज प्रकट दिन<br>*कालाष्टमी*<br>**३**<br>०६.३४ १८.१७ वृश्चिक | माघ अमावास्या<br>सावित्रीबाई फुले स्मृतिदिन<br>दर्श अमावास्या नाथयात्रा-मांगरूळ<br>प्रल्हाद महाराज रामदासी जयंती-साखरखेर्डा (बुलढाणा)<br>अमावास्या समाप्ती दुपारी ०२.३०<br>**१०**<br>०६.२८ १८.१९ कुंभ २०.४० | फाल्गुन शु. ८ शुभ दिवस (स.९.३९नं.)<br>*दुर्गाष्टमी*<br>**१७**<br>०६.२२ १८.२२ मिथुन | फाल्गुन शु. १४<br>**होळी**<br>हुताशनी पौर्णिमा<br>पूरिम (ज्यू)<br>पौर्णिमा प्रारंभ सकाळी ०९.५४<br>**२४**<br>०६.१६ १८.२४ सिंह १४.१९ |
| सो<br>सोमवार |  | माघ कृ. ८ शुभ दिवस (सायं.४.२०नं.)<br>राष्ट्रीय सुरक्षा दिन<br>आनंदस्वामी पुण्यतिथी-जालना<br>व्रजभूषण महाराज पुण्यतिथी-शिवर (दर्यापूर)<br>भानुदास महाराज जयंती -वायगांव (अमरावती)<br>**४**<br>०६.३३ १८.१७ वृश्चिक १६.२० | फाल्गुन शु. १ शुभ दिवस<br>फाल्गुन मासारंभ चंद्रदर्शन<br>निळोबाराय यात्रा प्रारंभ-पिंपळनेर (अ.नगर)<br>**११**<br>०६.२८ १८.२० मीन | फाल्गुन शु. ९<br>**१८**<br>०६.२१ १८.२२ मिथुन | फाल्गुन पौर्णिमा<br>**धूलिवंदन** चैतन्य जयंती<br>छायाकल्प चंद्रग्रहण (भारतातून दिसणार नसल्यामुळे वेधादि नियम पाळू नयेत.)<br>करिदिन<br>पौर्णिमा समाप्ती दुपारी १२.२९<br>**२५**<br>०६.१५ १८.२४ कन्या |
| मं<br>मंगळवार |  | माघ कृ. ९/१०<br>श्री रामदास नवमी<br>वामन महाराज जन्मोत्सव-सावनेर (अमरावती)<br>**५**<br>०६.३३ १८.१७ धनु | फाल्गुन शु. २/३<br>यशवंतराव चव्हाण जयंती<br>मुस्लिम रमजान मासारंभ<br>दादाजी महाराज साल्पेकर पुण्यतिथी -नागपूर<br>रामकृष्ण जयंती<br>अप्पा महाराज पुण्यतिथी -जळगाव<br>**१२**<br>०६.२७ १८.२० मीन २०.२९ | फाल्गुन शु. १० शुभ दिवस<br>मलकुजीनाथ महाराज यात्रा-अजंती दारव्हा<br>**१९**<br>०६.२० १८.२२ मिथुन १३.३६ | फाल्गुन कृ. १ शुभ दिवस<br>वसंतोत्सवारंभ<br>आम्रकुसुम प्राशन<br>अभ्यंगस्नान<br>**२६**<br>०६.१४ १८.२४ कन्या २६.५५ |
| बु<br>बुधवार | | माघ कृ. ११ शुभ दिवस (दु.२.५१नं.)<br>*विजया स्मार्त एकादशी*<br>**६**<br>०६.३२ १८.१८ धनु २०.२७ | फाल्गुन शु. ४ शुभ दिवस (दु.२.४१प.)<br>विनायक चतुर्थी<br>पारशी आबान मासारंभ<br>**१३**<br>०६.२६ १८.२० मेष | फाल्गुन शु. ११ शुभ दिवस (दु.१.१९प.)<br>*आमलकी एकादशी*<br>विषुवदिन<br>गुलाबपुरी महाराज पुण्यतिथी-नेरपिंगळाई (अमरावती)<br>**२०**<br>०६.२० १८.२३ कर्क | फाल्गुन कृ. २ शुभ दिवस<br>तुकाराम बीज<br>बीजोत्सव-देहू, जळू (अमरावती)<br>**२७**<br>०६.१३ १८.२५ तूळ |
| गु<br>गुरुवार | | माघ कृ. १२ शुभ दिवस<br>*भागवत एकादशी*<br>श्रवणोपवास<br>रामानंद जालनेकर महाराज जयंती -साखरखेर्डा (बुलढाणा)<br>**७**<br>०६.३१ १८.१८ मकर | फाल्गुन शु. ५<br>**१४**<br>०६.२५ १८.२१ मेष २२.३९ | फाल्गुन शु. १२<br>तिथिवासर सकाळी ०८.५८पर्यंत<br>जमशेदी नवरोज<br>**२१**<br>०६.१९ १८.२३ कर्क २५.२६ | फाल्गुन कृ. ३<br>**संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ०९.०४**<br>**छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तिथीप्रमाणे)**<br>**२८**<br>०६.१२ १८.२५ तूळ |
| शु<br>शुक्रवार | माघ कृ. ६<br>आवजीसिद्ध महाराज महोत्सव-सुनगांव (बुलढाणा)<br>ब्रह्मचारी महाराज पुण्यतिथी-पानेट (अकोला)<br>**१**<br>०६.३६ १८.१६ तूळ | माघ कृ. १३<br>**महाशिवरात्री** शिवपूजन प्रदोष<br>निशीथकाल मध्यरात्रौ १२.००पासून मध्यरात्रौ ००.४८पर्यंत<br>व्यंकटनाथ महाराज पुण्यतिथी<br>जागतिक महिला दिन<br>महाशिवरात्री यात्रा -गौमतेश्वर (बुलढाणा)<br>शिवगजानन यात्रा -बाळापूर (अकोला) *<br>**८**<br>०६.३० १८.१९ मकर २१.२० | फाल्गुन शु. ६ शुभ दिवस (सायं.४.०७नं.)<br>जागतिक ग्राहक दिन<br>**१५**<br>०६.२४ १८.२१ वृषभ | फाल्गुन शु. १३<br>प्रदोष<br>**२२**<br>०६.१८ १८.२३ सिंह | फाल्गुन कृ. ४<br>**गुड फ्रायडे**<br>**२९**<br>०६.११ १८.२५ तूळ १४.०८ |
| श<br>शनिवार | माघ कृ. ६<br>**२**<br>०६.३५ १८.१६ तूळ ०८.१६ | माघ कृ. १४<br>अमावास्या प्रारंभ सायं. ०६.१८<br>**९**<br>०६.२९ १८.१९ कुंभ | फाल्गुन शु. ७ शुभ दिवस<br>मुंगसाजी महाराज पुण्यतिथी -धामणगांवदेव (यवतमाळ)<br>सदाशिव महाराज अयाचित पुण्यतिथी -नागपूर<br>**१६**<br>०६.२३ १८.२१ वृषभ २८.२० | फाल्गुन शु. १३ शुभ दिवस<br>शहीद दिन<br>जागतिक हवामान दिन<br>**२३**<br>०६.१७ १८.२४ सिंह | फाल्गुन कृ. ५ शुभ दिवस<br>रंगपंचमी<br>कानिफनाथ यात्रा-मढी (अ.नगर)<br>सैलानीबाबा पालखी-पिंपळगांव सराई (बुलढाणा)<br>**३०**<br>०६.१० १८.२६ वृश्चिक |

१<br>२<br>३<br>४<br>५<br>६<br>७<br>८<br>९<br>१०<br>११<br>१२<br>१३<br>१४<br>१५<br>१६<br>१७<br>१८<br>१९<br>२०<br>२१<br>२२<br>२३<br>२४<br>२५<br>२६<br>२७<br>२८<br>२९<br>३०<br>३१

**फेब्रुवारी २०२४**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र | | ४ | ११ | १८ | २५ |
| सो | | ५ | १२ | १९ | २६ |
| मं | | ६ | १३ | २० | २७ |
| बु | | ७ | १४ | २१ | २८ |
| गु | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| शु | २ | ९ | १६ | २३ | |
| श | ३ | १० | १७ | २४ | |

**एप्रिल २०२४**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र | | ७ | १४ | २१ | २८ |
| सो | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| मं | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| बु | ३ | १० | १७ | २४ | |
| गु | ४ | ११ | १८ | २५ | |
| शु | ५ | १२ | १९ | २६ | |
| श | ६ | १३ | २० | २७ | |

Kalnirnay.Net
Kalnirnay.Net
Kalnirnay.Net
Kalnirnay.Net

Kalnirnay.Net



सुमंगल
कालनिर्णय
भारतीय परंपरेचे सांस्कृतिक प्रतीक
जगातील सर्वाधिक खपाचे ABC* प्रकाशन
*Audit Bureau of Circulations

Kalnirnay.Net

## आर्थिक गुंतवणुकीचे रहस्य

□ शेखर साठे

कष्टाने कमावलेल्या पैशाचे नेमके नियोजन कसे करावे, हा प्रामुख्याने मध्यमवर्गीय नोकरदारांना भेडसावणारा एक मोठा प्रश्न आहे. थोड्या कालावधीसाठी पैसे शेअर बाजारात गुंतवून दुप्पट करायच्या मोहाला अनेक जण बळी पडतात. यातून पदरचा पैसा उडून जातो आणि निराशा पदरात पडते. असे का होते हे समजून घेतले, तर पैशाचे नियोजन करणे सुलभ होईल आणि निराशा टळेल. पहिली गोष्ट म्हणजे त्यासाठी कोणतीही एकच निश्चित पाककृती उपलब्ध असल्याचा समज ठेवू नये. गुंतवणुकीच्या रसायनाचे घटक, पदार्थ सतत बदलत असतात. ते भेसळयुक्त असू शकतात, त्यांची 'निवड' जागरूकपणे करावी लागते, त्या स्वयंपाकघरात कायम अनिश्चिततेचे वातावरण असते. कच्च्या मालावर, चुलीवरच्या भांड्यावर आणि शिजलेल्या अन्नावर डल्ला मारणारे अनेक बोकेही आजूबाजूला घुटमळत असतात. एखाद्या तत्पर गृहिणीप्रमाणे काय शिजते आहे, त्यावर बारीक लक्ष ठेवावे लागते. म्हटले तर ती एक कला आहे, म्हटले तर ते एक शास्त्र आहे. एकदा मूलभूत तत्त्व समजले की पुढचे सोपे असते!

मध्यमवर्गीय सामान्य माणसासाठी नोकरी हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असते. बचतीमध्ये उत्पन्नाचे सातत्य सर्वात महत्त्वाचे आहे. त्यासाठी शिक्षण, नोकऱ्यांची निर्मिती होईल आणि संधी मिळतील अशा अर्थव्यवस्थेसाठी आग्रह धरण्याचे काम आपण करू शकतो. हातात येणारा पैसा मुख्यत्वे करून दोन कारणांमुळे वाया जातो. एक म्हणजे महागाई आणि दुसरी गोष्ट म्हणजे उधळपट्टी. वैयक्तिक उधळपट्टीवर आपण नियंत्रण ठेवू शकतो. त्यातून बचत निर्माण होते. त्या बचतीला सर्वात मोठा धोका महागाईचा आहे. वस्तु-सेवांचे भाव वाढले, की चालू उत्पन्नातील बचत कमी होते आणि आजवर केलेल्या बचतीचे अवमूल्यन होते. ते अवमूल्यन होऊ नये म्हणून महागाईवर मात करता येईल अशा पद्धतीने बचतीचे नियोजन करावे लागते. जेणेकरून महागाईच्या दरापेक्षा अधिक परतावा मिळेल अशा रीतीने गुंतवणूक योजावी लागते. नियोजनामध्ये परतावा, जोखीम आणि गुंतवणुकीचा कालावधी (बचतीचा उद्देश) यांच्यामध्ये तारतम्य ठेवावे लागते.

Kalnirnay.Net

आधुनिक भांडवलशाही जगात बाजाराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक विचारवंत शासन आणि समाज यांच्या जोडीला बाजाराला व्यवस्थेचा तिसरा आधारस्तंभ मानतात. त्यांच्या मते, आजच्या घडीला शासन आणि बाजार यांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे. दुर्दैवाने आर्थिक विकास चुकीच्या दिशेला वळल्यामुळे शासन आणि बाजार या दोन आधारस्तंभात एक घातक युती अलीकडच्या काही वर्षांत तयार होऊन समाजाचा आधारस्तंभ दुबळा होत आहे. अशा काळात व्यवस्थेतील अस्थिरता वाढते. बाजार म्हटले की व्यापार आला. व्यापार म्हटले की नफा आलाच. नफा म्हटले की नफेखोरी, पाठोपाठ मक्तेदारी येते. परिणामी, गुंतवणुकीतील जोखीम वाढते. असे होते तेव्हा सुरक्षिततेसाठी अव्वल कंपन्यांचे शेअर्स, कर्जरोखे आणि बँका यांच्या दिशेने गुंतवणूक वळवावी लागते. अर्थात, ही गोष्ट वैयक्तिक पातळीवर साधणे सोपे नाही. सुदैवाने, सध्याच्या काळात यासाठी छोट्या गुंतवणूकदारांसाठी सोईस्कर मार्ग आणि वाहने उपलब्ध झालेली आहेत. ती कोणती हे पाहण्याआधी आपण काही मूलभूत तत्त्वांची उजळणी करू.

पहिली गोष्ट म्हणजे बाजार संपत्ती निर्माण करत नाहीत. संपत्ती निर्माण करण्याचे काम समाजातल्या उत्पादक शक्ती शेतात, कारखान्यात आणि सेवा-उद्योगात करतात. बाजार हे केवळ त्या संपत्तीची खरेदी-विक्री करण्याचे ठिकाण असते. दुसरी गोष्ट म्हणजे संपत्ती एका रात्रीत तयार होत नाही. मूल्य निर्मितीसाठी अनेक वर्षांचा कालावधी लागतो. झटपट श्रीमंती मृगजळासमान असते. तिसरी गोष्ट म्हणजे बाजारात चोर-भामट्यांचा सुळसुळाट असतो. म्हणून बाजाराच्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सेबी, आरबीआय, आयआरडीए, पेन्शन नियामक मंडळ यासारख्या संस्था आणि वेगवेगळ्या तपास यंत्रणा नि:पक्षपातीपणाने आणि जागरूक राहून वित्तीय आणि शेअर बाजार सुरक्षित ठेवतील अशी रास्त अपेक्षा सुशासित राज्यात आपण करू शकतो. झटपट श्रीमंत झालेले लोक अकस्मात घबाड सापडल्यामुळे किंवा बेसुमार जोखीम घेतल्यामुळे कधी लबाडीने तर कधी सत्तेच्या दुरुपयोगाने श्रीमंत झाले असण्याची शक्यता अधिक असते. कुणी एका झटक्यात अरबपती झाला तर कुठेतरी खड्डा पडून तसे घडले असे समजायला काहीही हरकत नाही. अशा लोकांच्या पाठी लागणे यासारखी धोकादायक दुसरी गोष्ट नाही. महागाई हा भांडवली अर्थव्यवस्थेचा आधारभूत घटक आहे. त्यामुळे ती या व्यवस्थेत नाहीशी करता येणार नाही. पण ती बेतात आणि आटोक्यात ठेवण्याचे काम राज्यकर्त्यांचे आणि धोरणकर्त्यांचे आहे. ते तसे करतात की नाही, यावर नजर ठेवण्याचे काम आपले आहे.

नियोजनासाठी गुंतवणुकीच्या उद्दिष्टांचे भान बाळगणे अपरिहार्य आहे. तहान लागल्यावर विहीर खणणे जसे अव्यवहार्य आहे, तसेच पैसे उडून गेल्यावर बचतीचा विचार करणे अदूरदृष्टीचे निदर्शक आहे. प्रत्येकाने कमवायला लागल्याबरोबर लगेच गुंतवणुकीचा विचार करायला हवा. कमवायला जसे डबल इंजिन हवे तसेच गुंतवणुकीलाही, शेअर बाजार आणि ठेवी-कर्जरोख्यांचे! घर किंवा उच्च शिक्षणासारख्या दीर्घकालीन गरजेसाठी सम्यक कर्जाचाही विचार करावा. परंतु तसे करताना उत्पन्नाच्या शाश्वतीचा आणि कर्जाच्या हप्त्याचा मेळ घातला पाहिजे. मात्र आर्थिक गुंतवणुकीसाठी कर्ज काढणे अत्यंत धोकादायक असते, हे लक्षात ठेवायला हवे. मी-मी म्हणणारे धनाढ्य लोक अशा कर्जापायी स्वत: मेटाकुटीला आल्याची आणि त्यांच्याबरोबर इतर सामान्य गुंतवणूकदारांना फटका बसल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्याकडे दुर्लक्ष करणे अर्थसाक्षरतेच्या अडाणीपणाचे लक्षण म्हटले पाहिजे.

वर गुंतवणुकीच्या नव्या मार्गांचा आणि वाहनांचा उल्लेख केला, त्यामध्ये म्युच्युअल फंड हा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. म्युच्युअल फंडाची आणि त्यांच्या योग्य गुंतवणुकीच्या योजनांची निवड करताना अधिकृत सल्लागाराची (फी भरून) मदत घेणे केव्हाही श्रेयस्कर. फुकटचा सल्ला बरेचदा महागात पडतो किंवा सल्लागाराच्या फायद्यात जातो. हल्ली सिस्टेमॅटिक गुंतवणुकीच्या अनेक योजना उपलब्ध आहेत. त्यांचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे छोट्या-छोट्या रकमेच्या गुंतवणुकीतसुद्धा आपण 'डायव्हर्सिफिकेशन' करू शकतो. शेअर बाजार आणि कर्जरोखे दोन्ही प्रकारांमध्ये निवेश आणि निकास यासाठी हा मार्ग अत्यंत सुलभ आहे. दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी 'शेअर इंडेक्स फंड' अतिशय किफायतशीर आणि परिणामकारक असतात. तरुण वयात 'शेअर्स फंड' अधिक सयुक्तिक तर उतारवयात 'डेट फंड' समर्पक. कोणताही चांगला, प्रशिक्षित सल्लागार ही माहिती सहज देऊ शकेल. अजून एका गोष्टीबद्दल सावधगिरी बाळगायला हवी. आयुर्विमा कंपन्यांकडे गुंतवणुकीचे साधन म्हणून पाहू नये. त्यांच्याकडे केवळ विमा उतरविणाऱ्या संस्था म्हणून पाहावे. आरोग्य सेवा आणि शिक्षण यावरील खर्च नियंत्रणाबाहेर आणि आवाक्याबाहेर जाऊ शकतो. शिक्षण आणि आरोग्य ही सर्वात महत्त्वाची गुंतवणूक आहे. याचे महत्त्व आपल्या कुटुंबीयांना पटवून दिले पाहिजे. तसेच त्या बाबतीतल्या अनियंत्रित महागाईबद्दल सरकारलासुद्धा धारेवर धरायला हवे.

*(लेखक ज्येष्ठ वित्त आणि गुंतवणूक तज्ज्ञ आहेत.)*

Kalnirnay.Net

*shekharsathester@gmail.com* ❀

### * अधिक शास्त्रार्थ

८. सिद्धेश्वरयात्रा-वहाळाबु. (अकोला)
लक्ष्मणपुरी महाराज पुण्यतिथी -गोमेश्वर (बुलढाणा)
जानगीरबाबा यात्रा-शिरपूर जैन (अकोला)
गजानन महाराज यात्रा-कोडोली (अकोला)
सिद्धेश्वर महाराज यात्रा-धोत्रा (औरंगाबाद)
शंभूमहादेव यात्रा-सालबर्डी (अमरावती)

## घरगुती कचऱ्याचे स्मार्ट नियोजन

घरात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे घरातच किंवा इमारतीच्या आवारात विघटन करून सेंद्रिय खत तयार करणे ही काळाची गरज आहे. या सेंद्रिय खताचा वापर आपण आपल्या बागेतील झाडांसाठी करू शकतो. 'स्मार्ट कम्पोस्ट बास्केट'द्वारे सहज, सोप्या पद्धतीने ओल्या कचऱ्याचे सेंद्रिय खतात रूपांतर करता येते. हे बास्केट वापरण्याची सोपी पद्धत पुढीलप्रमाणे...

Kalnirnay.Net

१) हे स्मार्ट कम्पोस्ट बास्केट सर्व बाजूंनी जाळीचे बनलेले आहे.

२) बास्केटच्या तळाशी एक पॅकेट कल्चर (कॉलनी ऑफ बॅक्टेरिया) हँडलच्या मदतीने सर्वत्र पसरवून घेणे. या प्रक्रियेमुळे त्याचे चांगले एरेशन-aeration (कार्बन डायऑक्साईड वायूशी संयोग) होते. कचऱ्याचे खतात रूपांतर करण्याचे काम हे कल्चर करते.

३) घरगुती ओला कचरा म्हणजे निसर्गनिर्मित, कुजणारा किंवा सडणारा कचरा. यामध्ये झाडांची पाने, फळे, फुले, भाज्यांची देठे, अंड्यांची टरफले आणि टाकाऊ अन्नपदार्थ यांचा समावेश होतो. या कचऱ्याचे बारीकबारीक तुकडे करून घेणे. जेणेकरून त्याचे विघटन लवकर होऊन खताची बारीक पावडर तयार होईल. हा बारीक केलेला कचरा बास्केटमधील कल्चरवर टाकून हँडलच्या मदतीने हलवून एकजीव करून घ्यावा.

४) एक कागद (शक्यतो वृत्तपत्र) घेऊन कल्चरमिश्रित कचऱ्याला दाबून ठेवणे. खत तयार होण्यासाठी कल्चर आणि कचऱ्यात उष्णता निर्माण होणे आवश्यक आहे, त्यासाठी मिश्रणावर कागद दाबून ठेवावा लागतो.

५) बास्केटमधील कल्चरमिश्रित कचऱ्यात हवा, तापमान आणि आर्द्रतेचे प्रमाण समान राखावे लागते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर बास्केटचे झाकण बंद करा.

Kalnirnay.Net

६) दुसऱ्या दिवसाचा कचरा टाकताना बास्केटमधील पहिल्या कचऱ्यावर ठेवलेला कागद हटवून त्यावर हा नवीन कचरा टाकून सर्व कचरा एकजीव करून घ्या.

७) आता त्यावर पुन्हा कागद दाबून ठेवा. हीच प्रक्रिया आपल्याला सतत करायची आहे.

८) खत तयार होण्यासाठी एरेशन ही प्रक्रिया महत्त्वाची असल्याने नव्याने कचरा टाकला की तो हँडलने चांगला हलवून मिश्रण एकजीव करून घेणे आवश्यक असते.

९) खतामध्ये जितकी हवा मोकळी राहील, खेळती राहील तेवढे उत्तम खत तयार होते. तसेच कचरा सडताना किंवा कुजताना त्यातून दुर्गंधी येत नाही, त्यात किडे होत नाही किंवा कचऱ्यातून सांडपाणी गळत राहत नाही.

१०) ओल्या कचऱ्यामध्ये ७० टक्के पाणी आणि ३० टक्के सुका कचरा असतो. त्यामुळे काही वेळा खत तयार होताना मिश्रणात अधिकचा ओलावा तयार होतो. बास्केटमधील मिश्रण अधिक ओलसर झाले असल्यास त्यात कोकोपीट (नारळाचा भुसा/काथ्या, नारळाच्या करवंटीचे बारीक बारीक तुकडे करून कोकोपीट मेकिंग मशीनच्या साहाय्याने त्याची बारीक पूड केली जाते.) घालून चांगले एकजीव करून घ्या.

११) कोकोपीट मिश्रणातील अधिकचा ओलावा शोषून घेतो, त्यामुळे कल्चरमिश्रित कचऱ्यातील आर्द्रतेची पातळी समान राखण्यास मदत होते.

१२) उन्हाळ्यात वातावरण कोरडे असल्याने मिश्रणात ओलावा कमी होतो, त्या वेळी मिश्रणावर थोडे पाणी शिंपडून मिश्रणातील ओलावा टिकवून ठेवावा लागतो.

१३) पावसात ही परिस्थिती उलट होते. वातावरण दमट असल्याने मिश्रणात अधिक ओलावा तयार होतो. त्या वेळी मिश्रणात कोकोपीट मिक्स करता येईल.

१४) हे बास्केट पूर्ण भरायला अंदाजे तीन ते चार महिने लागतात. अंदाजे वीस दिवसांमध्ये कचऱ्याचे खतात रूपांतर होते. कचरा काळा झाला, की खत तयार झाले असे समजावे. दर १५ दिवसांनी नवीन कचरा टाकण्यापूर्वी तयार खत काढून घ्या.

*editor@kalnirnay.com* ❀

**कालनिर्णय**

**प्रकाशन स्थळ :** १७२, मुं. म. ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.
**प्रसिद्धीचा नियतकाल :** वार्षिक (नोव्हेंबर ते डिसेंबरच्या दरम्यान)
**मुद्रक-प्रकाशक-संपादक :** **जयराज साळगावकर** (भारतीय) लक्ष्मी सदन, दादर, मुंबई - ४०० ०१४.
**मालक : सुमंगल प्रेस प्रा. लिमिटेड** दादर, मुंबई - ४०० ०१४.
मी, **जयराज साळगावकर** जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे.
**जयराज साळगावकर,** संपादक, प्रकाशक.
**मुद्रणस्थळ : सुमंगल आर्टेक,** जी-८, एम्. आय्. डी. सी., अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०९३.
**सर्व कायदेशीर बाबींसाठी मुंबई हेच कार्यक्षेत्र राहील.**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मते, विचार, उपाय, सल्ले, इ. त्या त्या लेखकांची आहेत. वाचकांनी आपल्या जबाबदारीवर व योग्य तो सल्ला तज्ज्ञांकडून घेऊन त्याचा अवलंब करावा.
**जयराज साळगावकर**
**संपादक-प्रकाशक**

कालनिर्णय **पाकनिर्णय** स्पर्धा २०२४ — विजेता क्र. ३
मांसाहारी कबाब

## तंदुरी चिकन रुलाड

□ स्मिता गोरक्षकर, मुंबई

**चिकन मॅरिनेशनसाठी साहित्य :** ४ नग चिकन ब्रेस्ट, २ मोठे चमचे लिंबाचा रस, २ मोठे चमचे आले-लसूण पेस्ट, २ मोठे चमचे घट्ट दही, २ मोठे चमचे तंदुरी मसाला, १ मोठा चमचा बेसन, १ छोटा चमचा जिरेपूड, १ छोटा चमचा धणेपूड, $^{1}/_{2}$ छोटा चमचा चाट मसाला, १ छोटा चमचा कसुरी मेथी, १ छोटा चमचा काश्मिरी लाल तिखट, $^{1}/_{4}$ छोटा चमचा काळीमिरी पूड, २ मोठे चमचे मोहरी तेल, चिकनच्या कॅरमेलायजेशनसाठी १ मोठा चमचा बटर व चवीनुसार मीठ.

**स्टफिंगसाठी साहित्य :** ३ कप ब्लांच केलेला आणि चिरलेला पालक, $^{1}/_{2}$ कप मोझरेला चीज, $^{1}/_{2}$ कप पारमेसन चीज, १ मोठा चमचा चिरलेला लसूण, $^{1}/_{4}$ छोटा चमचा काळीमिरी पूड, चवीनुसार मीठ, २ चमचे ऑलिव्ह ऑइल.

**ग्रिल करण्यासाठी :** थोडे बटर

**कृती :** प्रथम चिकनचा ब्रेस्ट पिस घेऊन त्याला मधून चीर द्या, पूर्ण कापू नये. तो तुकडा उघडला गेला पाहिजे. चिकनचा तुकडा मीट हॅमरने ठोकून सपाट करून घ्या. आधी मॅरिनेशनचे साहित्य एकत्र करून त्यात चिकन



मॅरिनेट करा. आता एका पॅनमध्ये २ चमचे ऑलिव्ह ऑइल गरम करा आणि त्यात चिरलेला लसूण घाला. कच्च्या लसणाचा वास जाईपर्यंत लसूण परतून घ्या. पॅनमध्ये तयार ब्लांच पालक, काळीमिरी व मीठ घालून २-३ मिनिटे परतवा. मग थंड करा. थंड झालेल्या पालकमध्ये मोझरेला आणि पारमेसन चीज घालून चांगले एकजीव करा. चिकनचा तुकडा परत सपाट करून त्यावर पालकचे मिश्रण पसरवा. चिकनचा तुकडा रोल करून सुतळीने बांधून २ तास फ्रिजमध्ये ठेवा. ओव्हन १९०° वर प्रीहीट करून घ्या. एका पॅनमध्ये बटर घालून वितळवा. मग चिकनचा रोल केलेला तुकडा बटरमध्ये घोळवून प्रीहीट केलेल्या ओव्हनमध्ये १५ मिनिटांसाठी ग्रिल करा. थंड झाल्यावर सुतळ काढून सर्व्ह करा.

**टीप :** चिकनचा रस टिकवून ठेवण्यासाठी मॅरिनेट करण्यापूर्वी चिकन ब्रेस्ट मिठाच्या पाण्याच्या द्रावणात किमान ३० मिनिटे भिजवून ठेवा.

## ह्य महिना असा जाईल — जयेंद्र साळगांवकर

**मेष :** संघर्षाशिवाय काहीच मिळत नाही, जर तुम्हाला तुमचे आयुष्य चांगल्याप्रकारे जगायचे असेल तर परिस्थितीनुसार वागावे लागेल. नात्यात तोचतोचपणा आणायला आपणच जबाबदार असाल तेव्हा काहीतरी वेगळे करा. ज्येष्ठ व्यक्तींचा मान राखा.

**वृषभ :** शांतपणे विचार केल्यास भविष्याचे उत्तम नियोजन करता येईल. दातृत्वाचा अतिरेक तुमच्याकडून होणार नाही याची काळजी घ्या. विद्यार्थ्यांनी काहीतरी नवे शिकण्याचा प्रयत्न करावा. प्रवासामध्ये आपली चीजवस्तू सांभाळावी.

**मिथुन :** अनोळखी व्यक्तींबरोबर व्यवहार करताना सावध राहा. प्रसिद्धीच्या लोभात पडू नका. नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. अनेकांना मार्गदर्शन करू शकाल. एखाद्या चांगल्या घटनेने मनोबल वाढेल. संयम व सामंजस्य यांचा उपयोग करून पुढे जाण्याचा प्रयत्न करा.

**कर्क :** एखादा संकल्प सोडला की त्याचे अवलंबन होत आहे की नाही हे बघणेही तितकेच महत्त्वाचे आहे, त्यासाठी तुमच्या रोजच्या प्रगतीची नोंद ठेवली पाहिजे. फक्त विचार करू नका तर कृती करा. गोड बोलणाऱ्या मित्रांपासून सावध राहा.

**सिंह :** स्वत:च्या कामाबद्दल आणि कर्तव्याबद्दल व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारल्यास तुमचा आत्म-विश्वास वाढेल. घेण्यापेक्षा देण्यात आनंद माना. पती-पत्नींनी एकमेकांना सल्ला द्यावा परंतु आग्रही दृष्टिकोन टाळावा. जंकफूड सोडा, भाकरीकडे वळा.

**कन्या :** अति आत्मविश्वास बाजूस ठेवून योग्यवेळी योग्य धोरण राबवणे हिताचे ठरेल. गुप्त शत्रूपासून आपल्याला सतत सावधानता बाळगावी लागणार आहे. तुम्ही चिंता सोडा, चिंतन करा. शत्रू, विरोधकांवर बारीक नजर ठेवा.

**तूळ :** वैयक्तिक जीवनात सांभाळून वागावे म्हणजे नंतर पश्चात्ताप करायला लागणार नाही. आवडत्या गोष्टी प्रेमाने करत राहा, यश आपोआप मिळेल. जीवनसाथीचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्या. प्रेमातील आपले सहकार्य दिसेल याची दक्षता घ्या.

**वृश्चिक :** कौटुंबिक जबाबदारीचे काटेकोर पालन करा. विरोधकांचे डावपेच ओळखण्याचे बुद्धिसामर्थ्य विकसित करा. सावध तो समाधानी, हे व्यवहार सूत्र विसरू नका. मुलांच्या प्रगतीत आहाराविहाराची बंधने पाळणे अत्यावश्यक ठरेल.

**धनु :** आपण जे करत आहोत त्यावर मनापासून प्रेम पाहिजे, जर प्रेम असेल तर गुणवत्ता विकसित होईल. तिच्यातून कर्तृत्व उमलेल. मत्सर, मोह, मद, क्रोध या मानसिक भावनांना नेहमी नियंत्रणात ठेवावे, यांना कधीही व्यक्त करू नये.

**मकर :** इच्छा असेल तर मार्ग दिसेल. लेखन करताना काळजी घ्या. नवनव्या आव्हानांस सामोरे जाण्याची मनाची तयारी ठेवा. शेजाऱ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळेल. आपण स्वत:मध्ये बदल केला की बाजूचे जग आपोआप बदलते.

**कुंभ :** राजकीय क्षेत्रात वेगाने हालचाल करता येईल. दुसऱ्यांना दोष न देता स्वत:चा आलेख उंचावण्याचा प्रयत्न करा. कठीण काळातसुद्धा लोकांकडून मोलाची मदत मिळेल. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल. कोणाला जामीन राहू नका.

**मीन :** इतरांनी आपले म्हणणे मान्य करावे, असा आग्रह चुकीचा ठरेल. तुमच्या विचारांमध्ये व कृतीमध्ये धडाडी व धाडसीपणा येईल. आर्थिक नियोजन बिघडण्याची शक्यता आहे. तेव्हा दक्ष राहा. वैयक्तिक बाबतीत कोणाशीही चर्चा करू नका. वाहन अत्यंत काळजीपूर्वक चालवावे.

### संकष्ट चतुर्थी चंद्रोदय

**गुरुवार, २८ मार्च २०२४**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | २१.२७ | वर्धा | २१.०६ | | | | |
| ठाणे | २१.२६ | यवतमाळ | २१.०७ | | | | |
| पुणे | २१.२२ | बीड | २१.१५ | | | | |
| रत्नागिरी | २१.२२ | सांगली | २१.१६ | | | | |
| कोल्हापूर | २१.१७ | सावंतवाडी | २१.१८ | | | | |
| सातारा | २१.२० | सोलापूर | २१.१२ | | | | |
| नाशिक | २१.२४ | नागपूर | २१.०४ | परभणी | २१.११ | बुलढाणा | २१.१५ |
| अहमदनगर | २१.१९ | अमरावती | २१.०९ | नांदेड | २१.०८ | इंदौर | २१.२० |
| पणजी | २१.१७ | अकोला | २१.१२ | उस्मानाबाद | २१.१२ | ग्वाल्हेर | २१.१७ |
| धुळे | २१.२२ | औरंगाबाद | २१.१८ | भंडारा | २१.०२ | बेळगाव | २१.१५ |
| जळगाव | २१.१९ | भुसावळ | २१.१८ | चंद्रपूर | २१.०२ | मालवण | २१.२० |

### विवाहास उपयुक्त दिवस

३ (१५.५४ पर्यंत), ४ (१६.२० नंतर, २६.०० पर्यंत), ६ (१४.५१ नंतर, २६.०० पर्यंत), १६ (२१.३८ पर्यंत), १७ (०९.३९ नंतर, १६.४६ पर्यंत), २६ (२२.१६ पर्यंत), २७ (२६.०० पर्यंत), ३० (२२.०३ पर्यंत).

### पंचांग २०२४

**श्री शालिवाहन शके १९४५, शोभननाम संवत्सर, विक्रम संवत २०८०**

आकडे तास मिनिटांत मध्यान्ही १२ नंतर १ पासून प्रारंभ न करता दुसऱ्या दिवशीच्या सूर्योदयापर्यंत सरळ तास मोजले आहेत. उत्तरायण

| मार्च | माघ-फाल्गुन | | नक्षत्र | समाप्ती | योग | समाप्ती | करण | समाप्ती | राष्ट्रीय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ शुक्र | कृ. षष्ठी | अहोरात्र | स्वाती | १२.४७ | ध्रुव | १८.१३ | गरज | १९.१२ | ११ |
| २ शनि | कृ. षष्ठी | ०७.५३ | विशाखा | १४.४१ | व्याघात | १८.०५ | विष्टि | २०.२४ | १२ |
| ३ रवि | कृ. सप्तमी | ०८.४४ | अनुराधा | १५.५४ | हर्षण | १७.२३ | बालव | २०.५२ | १३ |
| ४ सोम | कृ. अष्टमी | ०८.४८ | ज्येष्ठा | १६.२० | वज्र | १६.०४ | तैतिल | २०.३२ | १४ |
| ५ मंगळ | कृ. नवमी<br>कृ. दशमी | ०८.०४<br>३०.३० | मूळ | १५.५९ | सिद्धि | १४.०७ | वणिज | १९.२३ | १५ |
| ६ बुध | कृ. एकादशी | २८.१३ | पूर्वाषाढा | १४.५१ | व्यतिपात | ११.३२ | बव | १७.२७ | १६ |
| ७ गुरु | कृ. द्वादशी | २५.२० | उत्तराषाढा | १३.०२ | वरियान<br>परिघ | ०८.२३<br>२८.४४ | कौलव | १४.५१ | १७ |
| ८ शुक्र | कृ. त्रयोदशी | २१.५८ | श्रवण | १०.४० | शिव | २४.४५ | गरज | ११.४२ | १८ |
| ९ शनि | कृ. चतुर्दशी | १८.१८ | धनिष्ठा<br>शततारका | ०७.५४<br>२८.५५ | सिद्ध | २०.३२ | विष्टि<br>चतुष्पाद | ०८.०९<br>२८.२४ | १९ |
| १० रवि | अमावास्या | १४.३० | पू.भाद्रपदा | २५.५५ | साध्य | १६.१३ | किंस्तुघ्न | २४.३७ | २० |
| ११ सोम | शु. प्रतिपदा | १०.४५ | उ.भाद्रपदा | २३.०३ | शुभ | ११.५७ | बालव | २०.५७ | २१ |
| १२ मंगळ | शु. द्वितीया<br>शु. तृतीया | ०७.१३<br>२८.०४ | रेवती | २०.२९ | शुक्ल<br>ब्रह्मा | ०७.५२<br>२८.०७ | तैतिल | १७.३५ | २२ |
| १३ बुध | शु. चतुर्थी | २५.२६ | अश्विनी | १८.२४ | ऐंद्र | २४.४७ | वणिज | १४.४० | २३ |
| १४ गुरु | शु. पंचमी | २३.२६ | भरणी | १६.५५ | वैधृति | २१.५८ | बव | १२.२० | २४ |
| १५ शुक्र | शु. षष्ठी | २२.०९ | कृत्तिका | १६.०७ | विष्कंभ | १९.४४ | कौलव | १०.४१ | २५ |
| १६ शनि | शु. सप्तमी | २१.३८ | रोहिणी | १६.०४ | प्रीति | १८.०६ | गरज | ०९.४७ | २६ |
| १७ रवि | शु. अष्टमी | २१.५२ | मृगशीर्ष | १६.४६ | आयुष्मान | १७.०४ | विष्टि | ०९.३९ | २७ |
| १८ सोम | शु. नवमी | २२.४८ | आर्द्रा | १८.०९ | सौभाग्य | १६.३५ | बालव | १०.१५ | २८ |
| १९ मंगळ | शु. दशमी | २४.२१ | पुनर्वसु | २०.०९ | शोभन | १६.३५ | तैतिल | ११.३१ | २९ |
| २० बुध | शु. एकादशी | २६.२२ | पुष्य | २२.३७ | अतिगंड | १६.५९ | वणिज | १३.१८ | ३० |
| २१ गुरु | शु. द्वादशी | २८.४४ | आश्लेषा | २५.२६ | सुकर्मा | १७.४० | बव | १५.३१ | चैत्र |
| २२ शुक्र | शु. त्रयोदशी | अहोरात्र | मघा | २८.२७ | धृति | १८.३३ | कौलव | १७.५९ | २ |
| २३ शनि | शु. त्रयोदशी | ०७.१७ | पूर्वा | अहोरात्र | शूल | १९.३२ | गरज | २०.३५ | ३ |
| २४ रवि | शु. चतुर्दशी | ०९.५४ | पूर्वा | ०७.३३ | गंड | २०.३२ | विष्टि | २३.१२ | ४ |
| २५ सोम | पौर्णिमा | १२.२९ | उत्तरा | १०.३६ | वृद्धि | २१.२८ | बालव | २५.४३ | ५ |
| २६ मंगळ | कृ. प्रतिपदा | १४.५५ | हस्त | १३.३२ | ध्रुव | २२.१६ | तैतिल | २८.०३ | ६ |
| २७ बुध | कृ. द्वितीया | १७.०६ | चित्रा | १६.१४ | व्याघात | २२.५२ | वणिज | ३०.०४ | ७ |
| २८ गुरु | कृ. तृतीया | १८.५६ | स्वाती | १८.३७ | हर्षण | २३.११ | बव | अहोरात्र | ८ |
| २९ शुक्र | कृ. चतुर्थी | २०.२० | विशाखा | २०.३५ | वज्र | २३.१० | बव | ०७.४२ | ९ |
| ३० शनि | कृ. पंचमी | २१.१३ | अनुराधा | २२.०२ | सिद्धि | २२.४५ | कौलव | ०८.५१ | १० |
| ३१ रवि | कृ. षष्ठी | २१.३० | ज्येष्ठा | २२.५५ | व्यतिपात | २१.५१ | गरज | ०९.२७ | ११ |

*दि. १-३-२०२४ रोजी सूर्योदयी रवि, बुध, शनि-कुंभ, चंद्र-तुला, मंगळ, शुक्र, प्लुटो-मकर, गुरु, हर्षल-मेष, नेपच्यून-मीन.*

★ बुध : मीन ०७-३, शुक्र : कुंभ ०७-३, रवि : मीन १४-३, मंगळ : कुंभ १५-३, बुध : मेष २५-३, शुक्र : मीन ३१-३.

● **अमावास्या प्रारंभ** : शनिवार ०९-३, सायं. ०६.१८; **समाप्ती** : रविवार १०-३, दुपारी ०२.३०.

○ **पौर्णिमा प्रारंभ** : रविवार २४-३, सकाळी ०९.५४; **समाप्ती** : सोमवार २५-३, दुपारी १२.२९.

# KALNIRNAY.Net

**Download Marathi Calendar for Free**

Click on The Below Link to Download

| | | | |
|---|---|---|---|
| January ↗ | February ↗ | March ↗ | April ↗ |
| May ↗ | June ↗ | July ↗ | August ↗ |
| September ↗ | October ↗ | November ↗ | December ↗ |

© Kalnirnay.Net